अंध/अस्थीव्यंग/कण्याच्या विकाराने पीडीत/
मुकबधीर कर्मचा-यांना विशेष वाहतुक भत्ता
मंजुरीबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

सामान्य प्रशासन विभाग

जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-४/२१०/८०/२०२६

अहिल्यानगर दिनांक — स्वाक्षरीत नमुद केल्याप्रमाणे

संदर्भ :- १. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वाहभ/२०१३/प्र.क्र.५७/सेवा-५ दि.४/६/२००१

२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहभ/क्र१००३/प्र.क्र./सेवा-५ दि.०२/०८/२००४

३. शासन निर्णय क्र.डिएसआर/२००८/प्र.क्र./सेवा-५ दिनांक २७/०५/२००९

४. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहभ/२००९/प्र.क्र.७८/सेवा-५ दि.०५/०४/२०१०

५. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहभ/२०१४/प्र.क्र.५/सेवा-५ दि.३/६/२०१४

६. वित्त विभाग, शा.निर्णय क्र.वाहभ-२०१४/प्र.क्र.१६/सेवा-५/दिनांक १० ऑगस्ट २०१५

७. वित्त विभाग, शासन पूरकपत्र क्रमांक वाहभ/२०१४/प्र.क्र.१६/सेवा-५ दि.१८/०४/२०१७

८. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडील अधिकार प्रदाण आदेश क्र.साप्रवि-१/रवका/६९६/२०१६ दि.१७/०६/२०१६

९. गटविकास अधिकारी, पं. स. संगमनेर यांचेकडील प्रस्ताव जा. क्र. वशि/आस्था-१/७२९/२०२५ दि. ०३/०७/२०२५

१०. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.) यांचेकडील पत्र जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/३५४/२०२५ दि. ०५/०८/२०२५

११. गटविकास अधिकारी, पं. स. संगमनेर यांचेकडील पत्र जा. क्र. वशि/आस्था-१/१३०९/२०२५ दि. ०९/०८/२०२५

१२. मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि. प. अहिल्यानगर यांचेकडील मंजुर टिपणी दिनांक १३/०२/२०२६

उक्त संदर्भ क्र. ८ मधील मुददा १० अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद अहिल्यानगर खालील नमुद कर्मचा-यांना मा. जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेल्या अपंग प्रमानपत्रानुसार संबधित कर्मचारी हे ७५% शारिरिक दृष्टया अपंग असल्याचे प्रमाणीत केलेले आहे. वैदयकिय अधिका-याने दिलेल्या शिफारस पत्रात ज्या तारखेपासून अशा कर्मचा-यास अपंगत्व असल्याचे प्रमाणीत केले असल्यास त्या तारखेपासून किंवा त्याच्या नियमित वेतनश्रेणीच्या तारखेपासून यातील जी तारीख नंतर असेल तेंव्हापासून उक्त संदर्भिय शासन परिपत्रक व शासन निर्णयातील अटी व शर्तीस अधिन राहुन सामान्य प्रशासन विभागातील परिचर गट-ड या संवर्गातील खालील नमुद अपंग कर्मचा-यांना वाहतुक भत्ता (विशेष वाहन भत्ता) मंजुर करीत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव व हुदद्दा व कार्यरत कार्यालय | सलग सेवा दिनांक | अपंगाचा प्रकार, अपंगाची टक्केवारी व अपंग प्रमाणपत्राचा दिनांक | अपंग वाहतुक भत्ता मंजुरीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. नवनाथ सुर्यभान पोकळे, परिचर, प.वै.द. लोहारे, ता. संगमनेर | २३/१०/२००८ | अल्प दृष्टी, ७५ % दिनांक ३०/१०/२०१९ | दिनांक ३०/१०/२०१९ |

अटी व शर्ती —

१) कर्तव्यस्थानापासून एक कि.मी. अंतराच्या आत निवासस्थान असल्यास हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही. (वाहन भत्याचे प्रदाण संबधित कर्मचा-यास त्याला पुरविण्यात आलेले शासकीय निवासस्थान कर्तव्यस्थानापासून एक किलो मिटरच्या आत किंवा कर्तव्यस्थान यांच्या एकत्र परिसरात नाही असे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन राहुन वाहन भत्ता मंजुर करता येईल.

२) ज्या कर्मचा-यांना शासकीय सुविधा पुरविण्यात आलेली असेल त्यांना हा भत्ता अनुज्ञेय नाही.

३) अस्थीव्यंगामुळे अधू असलेल्या शासकीय कर्मचा-याला वरच्या अथवा खालच्या अवयवाची किमान ४०% कायमस्वरुपाची आंशिक विकलांगता असावी किंवा वरच्या व खालच्या मिळून किमान ६०% आंशिक विकलंगता असावी.

४) शासकीय कर्मचा-यांची दोन्ही दृष्टी ३/६० पेक्षा कमी असावी अथवा क्षेत्र दृष्टी १० अंशापेक्षा कमी असावी, परंतु एका डोळयाने अंध असलेली शासकीय कर्मचारी या आदेशाच्या प्रयोजनार्थ अंध मान्यता येऊ नये.

५) शासकीय कर्मचा-यास पाठीच्या कण्याच्या विकाराने ४०% पेक्षा अधिक कायमचे अंशिक अपंगत्व आलेले असावे.

६) वैदयकिय अधिका-याने आपल्या शिफारस पत्रात ज्या तारखेपासून अशा कर्मचा-यास अपंगत्व आल्याचे प्रमाणीत केले असल्यास त्या तारखेपासून किंवा त्याच्या शासकीय सेवेतील नेमनुकीच्या तारखेपासून यातील जी तारीख नंतर असले तेंव्हा पासून संबधित विभाग प्रमुखांनी वाहतूक भत्ता मंजुर करावा.

७) अपंग वाहनभत्ता लाभ देण्याअगोदर संबधित अपंग कर्मचा-याकडून १००/- रु.चे बॉन्ड पेपरवर भविष्यात लेखा परिक्षणात वसुली निघाल्यास ती भरण्यास मी तयार असले बाबतचे हमीपत्र घेण्यात येऊन त्या बाबतची नोंद मुळ सेवापुस्तकात घेण्यात येऊन हमीपत्र सेवापुस्तकात डकवावे.

८) सदर वाहतुक भत्ता हा रजा, प्रशिक्षण, दौरा इ.कारणामुळे ३० (तीस) दिवसापेक्षा जास्त अनुपस्थितीच्या कालावधीसाठी टाकुण अदा करण्यात यावी.

९) सदर आदेशाची नोंद संबधिताचे मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

१०) मुक बधीर व कर्ण बधीर कर्मचा-यांना शासन निर्णय दिनांक ३/६/१४ व ४/६/२०१४ तसेच दिनांक १० ऑगस्ट २०१५ मधील सुचना शर्ती व अटी प्रमाणे वाहतुक भत्ता अदा करण्याची कार्यवाही करावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक क्रं. 20260225040040 असा आहे.

Digitally signed by
SHELKE RAHUL ASHOK
Date: 25-02-2026
13:39:22

उप मुख्य कार्यकारी अधिकारी(साप्रवि)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. नवनाथ सुर्यभान पोकळे, परिचर, प.वै.द. लोहारे, ता. संगमनेर

प्रत:- मुख्य लेखा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:- गट विकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर

प्रत:- कार्यालयीन प्रत/निवड नस्ती.